MHOS190004122026

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६६/२०२६ मधील</u>**
**<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>**
**<u>(CNRNo.MHOS190004122026)</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट मधील कलम २ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

<u>अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे खालील प्रमाणे</u> -

२. अर्जदार क्र.१ ही कै.अरूण श्रीमंतराव अमृतराव यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आहेत. कै. अरूण श्रीमंतराव अमृतराव हे दि.०९.०२.२०२६ रोजी चंदन न्युरो सायन्स, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे मयत झाले आहेत. मयत अरूण श्रीमंतराव अमृतराव यांचे मृत्युपुर्वीचे कायमचे वास्तव्य हे तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव होते. तसेच, मयत अरूण श्रीमंतराव अमृतराव यांच्या आई नामे सरस्वती श्रीमंत अमृतराव हया पुर्वीच मयत झालेल्या आहेत. मयत अरूण श्रीमंतराव अमृतराव यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना शासकिय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व वारसप्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे देण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर दि.२१.०४.२०२६ रोजी 'दै.आम संघर्ष टाईम्स', धाराशिव या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रकाशीत

करून आक्षेप मागवणेत आले. परंतु, आजपर्यंत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

४. अर्जदार यांनी अर्ज शाबीत करणेकरीता अर्जदार क्र.२ सुयोग अरुणराव अमृतराव यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर, साक्षीदार क्र.१ हनुमंत दत्तोबा साठे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१२ वर व साक्षीदार क्र.२ सोमनाथ दगडोबा गाडे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१३ वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी तोंडी पुरावा संपल्याची पुरसीस नि. क्र.१४ वर दाखल केली आहे.

५. अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. एस. आर. क्षिरसागर यांनी युक्तीवाद केला. अर्जदार खालील कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहेत.

१) उपनिबंधक जन्म-मृत्यु कार्यालय, सोलापूर महानगरपालीका, सोलापूर यांनी दिलेले मयत अरुण श्रीमंतराव अमृतराव यांचे मृत्युप्रमाणपत्र नि. १६/१ वर दाखल केले आहे.

२) नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी दिलेले मयत सरस्वती श्रीमंत अमृतराव यांचे मृत्युप्रमाणपत्र नि. ४/२ वर दाखल केले आहे.

३) अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधार कार्डाच्या प्रती नि. अ.क्र. ४/३ ते ४/५ वर दाखल केल्या आहेत.

४) 'दै. संघर्ष', धाराशिव या वृत्तपत्रामधील दि.२१.०४.२०२६ रोजीचे आवृत्तीमधील जाहीर प्रगटन नि.१० वर दाखल आहे.

६. प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.२ सुयोग अरुणराव अमृतराव यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.११ वर, साक्षीदार क्र.१ हनुमंत दत्तोबा साठे यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.१२ वर व साक्षीदार क्र.२ सोमनाथ दगडोबा गाडे यांचे पुराव्याचे शपथपत्र

नि.१३ वर दाखल केले असून त्यांच्या पुराव्यावरून कै.अरूण श्रीमंतराव अमृतराव हे दि.०९.०२.२०२६ रोजी मयत झाले असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही वारस नाहीत असे दिसुन येते. अर्जदार यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा अबाधीत आणि अखंड विना आव्हानीत राहिलेला आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या पुराव्यावरून अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत अरूण श्रीमंतराव अमृतराव यांचे कायदेशीर वारसदार असल्याचे अर्जदार यांनी शाबीत केले आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ सुंदर अरुणराव अमृतराव, अर्जदार क्र. २ सुयोग अरुणराव अमृतराव व अर्जदार क्र. ३ संदीप अरूणराव अमृतरााव हे मयत अरुण श्रीमंतराव अमृतराव यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येते.

३. अर्जदार यांच्या नावे वारसप्रमाणपत्र अर्जदारांकडुन नियमाप्रमाणे न्यायालयीन मुद्रांक शुल्क घेऊन देण्यात यावे.

AWASEKAR SWATI DILIPRAO
Digitally signed by AWASEKAR SWATI DILIPRAO
Date: 2026.06.29 13:04:17 +0530

ठिकाण - तुळजापूर.
दिनांक – २९/०६/२०२६

(श्रीमती. एस.डी. अवसेकर )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order/issues are same, word to word, as per the original judgment/order/issues.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. S. D. Awasekar<br>Civil Judge Senior Division, Tuljapur, District - Dharashiv. |
| Date | --- | 29/06/2026 |
| Judgment/order/issues signed by the Presiding Officer on | --- | 29/06/2026 |
| Judgment/order/issues uploaded on | --- | 29/06/2026 |